महाराष्ट्र शासन

क्रमांकःइसैशा २००८/प्र.क्र.११५/माशि-७
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - २० जुलै,२००९

प्रति,
शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक,
महाराष्ट्र राज्य,पणे

विषयः-पद्मश्री डॉ वि.खे. पाटील, स्कूल प्रवरानगर, जिल्हा अहमदनगर यांनी नाकारलेली आदिवासी विद्यार्थ्यांची इ.५ वी ची तुकडी श्री छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय,मोराणे,जि.धुळे या सैनिकी शाळेस मंजूर करण्याबाबत.

संदर्भः-आपले क्र.सैशा/५ वी तुकडी/आदिवासी/धुळे/१५ क (७)/९५०२, दिनांक २१-८-२००८ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भाधिन पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन कळविण्यात येते की, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्रमांकःइसैशा-२००६/प्र.क्र.१२३/माशि-७, दिनांक २४.१२.२००७ च्या सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविल्यानुसार पद्मश्री डॉ वि.खे. पाटील, स्कूल प्रवरानगर, जिल्हा अहमदनगर या सैनिकी शाळेस आदिवासी विद्यार्थ्यांकरिता सैनिकी शाळांमधील जादा तुकडी मंजूर केली आहे. तथापि सदरची तुकडी सुरु करणे संस्थेस शक्य होणार नसल्याचे म्हणजेच त्यांना सदर तुकडी नको असल्याचे संस्थेने लेखी कळविल्यामुळे त्यांना नको असलेली आदिवासी विद्यार्थ्यांची इ.५ वीची जादा तुकडी छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय,मोराणे प्र.नेर,ता.जि.धुळे या सैनिकी शाळेस अनुदानित तत्वावर सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर संस्थेने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकःइसैशा-१०९५/(२७८/९५)/माशि-८ दिनांक २६.९.१९९५ तसेच शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमाकःइसैशा-२००६/प्र.क्र.१२३/माशि-७, दिनांक २४.१२.२००७ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क्र.मा.प.)



G-ESS 103-08-MS-7 19-9-08 lwn

२) आदिवासी विद्यार्थ्यांच्या या जादा तुकडीस लागणा-या पायाभूत सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.

३) या अतिरिक्त तुकडीसाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तसेंच विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार संस्थेने भरावयाचा आहे.

४) या आदिवासी विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रीया संबंधित यंत्रणेमार्फत करण्यात यावी. तद्नंतर तसा अहवाल शासनाकडे सादर करावा.

५) शासन अनुदानासंदर्भात तसेंच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाबाबत प्रचलित नियम व आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी तसेंच या विभागाकडून तसेंच आदिवासी विकास विभागाकडून भविष्यात वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांची अंमलबजावणी करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

६) पद्मश्री डॉ वि.खे. पाटील, स्कूल प्रवरानगर, जिल्हा अहमदनगर या सैनिकी शाळेस आदिवासी विद्यार्थ्यांकरिता मंजूर झालेली तुकडी कायमस्वरुपी रद्द करण्यात येऊन सदरहू तुकडीवर भविष्यात यापुढे सदर संस्थेचा कोणताही हक्क राहणार नाही या अटीवर इ.५ वी ची तुकडी छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय, मोराणे प्र.नेर, ता.जि.धुळे या सैनिकी शाळेस सुरु करण्यास मान्यता देण्यात यावी व तसे संबंधितांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

उपरोक्त अटी व शर्ती संस्थेस मान्य असल्यास त्यांच्याकडून तसे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र लिहून घ्यावे व तद्नंतर सदर सैनिकी शाळेला सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून इ.५ वी च्या आदिवासी विद्यार्थ्यांची एक अतिरिक्त तुकडी सुरु करण्यास मान्यता द्यावी.

सीमा उकाडे

( सीमा य. उकाडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,माहितीस्तव अग्रेषित:-
१) शिक्षण उपसंचालक,नाशिक विभाग,नाशिक
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,धुळे
३) आदिवासी विकास विभाग (कार्यासन-११) मंत्रालय,मुंबई
४) प्राचार्य,छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय,मोराणे प्र.नेर,ता.जि.धुळे

ESS 103/08-MS-7 19-9-08